# मराठी (MARATHI)

## ( 204 )

## चाचणी क्रमांक - 1

## ( धडा एका पासून बारा पर्यंत )

एकूण गुण : 25

**सूचना :** (i) सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाला समान गुण आहेत.

(ii) उत्तर पत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर वरच्या बाजूस आपले नाव, अनुक्रमांक, अभ्यास केंद्राचे नाव, विषय इत्यादी माहिती स्पष्ट शब्दात लिहावी.

1. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60 ते 80 शब्दात लिहा :

(1) झेल्याच्या वागणुकीतील बदल आपल्याला कोणत्या प्रसंगातून कळतो ?

(2) भावेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजेत असे लो. टिळकांना वाटते ?

(3) भारताच्या भौगोलिक विविधतेशी संबंधीत कोणते पौराणिक संदर्भ लेखकाच्या मनात आले ?

(4) महात्मा ज्योतीबा फुले यांनी शेतकऱ्याचे केलेले वर्णन लिहा.

2. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60–80 शब्दांत लिहा

(1) कापणीच्या वेळी शेतात कोणकोणते विधी श्रद्धापूर्वक केले जातात ?

(2) राज्यस्थापनेच्या कार्यास कसे वाहून ध्यावे, असे रामदास स्वामी संगातात ?

(3) जदकाच्या उदाहरणातून कवीने मानवी स्वभावाचे कोणते विशेष सांगितले आहेत ?

(4) श्रावणमास या कवितेत श्रावण महिन्याचे केलेले वर्णन लिहा.

3. हा तिमिर घोर संहारीन, हृदयास हृदय जोडून, ऐक्याचा मंत्र जपून या ओळींमधून भारताला बलसागर कसे करता येईल ते स्पष्ट करा.

किंवा

सागरास या कवितेत कवीने मातृभूमीचा निरोप घेताना कोणते आश्वासन दिले.

4. नागूची झोप फायदेशीर कशी ठरली याचे सविस्तार वर्णन करा.

किंवा

आचार्य विनोबा आवे यांनी सांगितलेले मातृशक्तीचे महत्व सांगा.

5. साने गुरुजींचे **श्यामची** आई हे पुस्तक वाचा.

त्यातील तुम्हाला आवडलेल्या प्रसंगाचे वर्णन लिहा.

# मराठी (MARATHI)
# ( 204 )
## चाचणी क्रमांक - 2
## ( धड़ा 13 ते 24 )

एकूण गुण : 25

**सूचना :** (i) सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाला समान गुण आहेत.

(ii) उत्तर पत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर वरच्या बाजूस आपले नाव, अनुक्रमांक, अभ्यास केंद्राचे नाव, विषय इत्यादी माहिती स्पष्ट शब्दात लिहावी.

1. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60 ते 80 शब्दातालिहा.

    1. डोंबाऱ्यांच्या कोणकोणत्या समस्या डोंबारी या पाठात सांगितल्या आहेत.

    2. खस्ता खाणे, आसन्नमरण, मोक्ष होणे या शब्दांचे अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा.

    3 पत्राबद्दल खोडेकरांनी वाचकांची उत्सुकता कशी बाढवली आहे?

2. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची 60 ते 80 शब्दात उत्तरे लिहा.

    1. 'तोच वारसा तुम्ही पोचवा येणाऱ्या शतका' याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.

    2. ईश्वराची पारुले कधी दिसली का, या कवीच्या प्रश्नाला चोदण्या काय उत्तर देतात?

    3. सूर्य, अंधार, सूर्यफुले या प्रतिकांचा वापर 'आता' या कवितेत कसा केला आहे ते स्पष्ट करा.

    4. भागवत धर्माची इमारत कशी साकार झाली?

3. महर्षी अण्णा कर्वे यांच्या कार्यांची सविस्तर माहिती लिहा.

किंवा

डॉ. हेडगेवार यांच्या किंवा विद्यार्थीदहोतील प्रसंगाचे वर्णन करा.

4.  रणांगणावर लढाईसाठी निधालेल्या आपल्या पतीला त्याची पत्नी निरोपदेत असतानाचे सविस्तर वर्णन लिहा.

**किंवा**

सहा त्रदुतुंचे सहा सोहळे येथे भान हटावे.

या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे. संदर्भासह स्पष्टीकरण द्या.

5.  शांत्रा शेळके यांच्या **<u>पाच</u>** कविता मिळवा. त्या पाढ करा.

# मराठी (MARATHI)
## ( 204 )
## चाचणी क्रमांक - 3
## ( धडा पंचवीस पासून चऊतीस पर्यंत )

एकूण गुण : 25

**सूचना :** (i) सर्व प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे गुण समान आहेत.

(ii) उत्तरपत्रिकेच्या पहिल्या पृष्ठावर वरच्या बाजूस आपले नाव, अनुक्रमांक, अभ्यास केंद्राचे नाव, विषय इत्यादी माहिती स्पष्ट शब्दांत लिहावी.

1. खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60 ते 80 शब्दात लिहा :

   1. आर्यभट्टाचे गणितातील योगदान यावर माहिती लिहा.

   2. विद्यार्थ्यांच्या कौतुक समारंभाचेवेळी करायचे आभाराचे भाषण तयार करा.

   3. उत्तम लेखन करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींचे ज्ञान असावे?

   4. पुढे दिलेल्या शब्दसमूहासाठी एक शब्द सुचवा त्याचा वाक्यात उपयोग करा.

   (अ) लोकांचे नेतृत्व करणारा, (ब) महिन्यातून एकदा प्रसिद्ध

   (क) गुप्त बातम्या काढणारा

2. खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 60 ते 80 शब्दात लिहा :

   1. सारांश लेखनाचे उपयोग लिहा.

   2. एखादे प्रकरण वाचल्यावर त्याचे आकलन कोणकोणत्या पायऱ्यांनी करावे?

   3. शब्द कोशात समाविष्ट करण्यासाठी पुढील शब्द वर्णक्रमानुसार लिहा. कढई, कॉट, कॅमेरा, कोमट, कात्री, किंमत, काढा, कुहु, केकारव, कौतुक

   4. फळाच्या करंडीत 25 संत्री, 50 आंबे, 25 मोसंबी, 100 सफरचंदे, 160 चिकू यांचा वृत्तालेख बनवा.

3. तुमची परीक्षा जवळ आली आहे. सर्व विषयांच्या अभ्यासविषयी तुमच्या मित्राशी झालेला संवाद 10 ओळीत लिहा.

**किंवा**

तुम्हाला मित्रांबरोबर सहलीला जायचे आहे त्यासाठी बडिलांची परवानगी मागण्यासाठी पत्र लिहा.

4. दूरदर्शन, वर्तमानपत्र यातील जाहिरातींचे मुलांवर होणाऱ्यां परिणामांविषयी तुमचे विचार लिहा.

**किंवा**

रस्त्यावर आलेला अपघात तुम्ही पाहिला आहे. त्याची वृत्तपत्रासाठी बातमी तयार करा.

5. तुमच्या परिसरातील 5 कुटुंबाची पुढील मुद्दयावर माहिती गोळा करा. त्याची तालिका (तक्ता) बनवा.

(1) घरातील व्यक्तिंची संख्या (2) मुलांची संख्या (3) मिळवत्या व्यक्तिंची संख्या (4) अन्नधान्यावर होणारा खर्च (5) शिक्षणावर होणारा खर्च (6) वीजेचा दरमहा खर्च.